## विद्यार्थी साहित्य संमेलन पुढे ढकलले

जळगाव (      ) महाराष्ट्राच्या काही भागातील पूरपरिस्थिती तसेच खान्देशात पुढील तीन दिवसात हवामान खात्याने दिलेला अतिवृष्टीचा इशारा लक्षात घेऊन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे ११ व १२ ऑगस्ट रोजी होणारे पहिले विद्यार्थी साहित्य संमेलन पुढे ढकलण्यात आले आहे.

रविवार पासून मूळजी जेठा महाविद्यालयात विद्यापीठाचे पहिले विद्यार्थी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. पश्चिम महाराष्ट्र तसेच इतर काही जिल्हयांमध्ये संततधार पावसामुळे नद्या-नाल्यांना महापूर येऊन जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. या जलप्रलयामुळे मोठी आपत्ती निर्माण झाली आहे. याशिवाय जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्हयात गेल्या चार दिवसांपासून सतत पाऊस पडतो आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार ८ ते १२ ऑगस्ट या कालावधीत या जिल्हयांमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. एकूणच मानवतेच्या भावनेतून हे विद्यार्थी साहित्य संमेलन पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. संमेलनाच्या पुढील आयोजनाच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.सत्यजित साळवे यांनी दिली.

---

बातमी क्र.२

## प्रथम नामविस्तार दिनानिमित्त रविवारी
## विद्यापीठात सांस्कृतिक कार्यक्रम

जळगाव ९ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रथम नामविस्तार दिनानिमित्त रविवार दि.११ ऑगस्ट रोजी विद्यापीठात परिवर्तन निर्मित 'अरे संसार संसार' हा बहिणाबाईंच्या गीत आणि कवितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

गतवर्षी ११ ऑगस्टला राज्य शासनाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असा केला. या प्रथम नामविस्तार दिनानिमित्त रविवारी दुपारी २.०० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात परिवर्तन जळगाव निर्मित 'अरे संसार संसार' ही शेती मातीशी नातं सांगणाऱ्या बहिणाबाईंची गीते आणि कवितांची सुरेल मैफल आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील राहणार असून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी. माहुलीकर यांची उपस्थिती असेल

अशी माहिती कुलसचिव भ.भा.पाटील यांनी दिली. रविवारी नामविस्तार दिनानिमित्त विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभाग सुरु राहणार आहेत.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ९ ऑगस्ट, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत/-

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी